मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# राष्ट्रवादीतील पडझड रोखण्यासाठी अजितदादा मैदानात

## पिंपरी चिंचवडमध्ये उद्या भूमिपूजन, उद्घाटने आणि जाहीर सभा : पिंपरी, चिंचवड विधानसभेच्या उमेदवारीबाबत काय बोलणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक माजी नगरसेवकांनी वेळप्रसंगी तुतारी हातात घेण्याचा दिलेला इशारा तसेच चिंचवडच्या जागेवरुन निर्माण झालेल्या प्रश्नामुळे पक्षातील खदखद वाढल्याने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार अस्वस्थ आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या शहरातील अस्तित्वालाच धोका निर्माण होत असल्याने अजितदादा मैदानात उतरले आहेत. दरम्यान, ही पडझड रोखण्यासाठी महापालिकेची भूमिपूजन आणि उद्घाटनांचे निमित्त करून ते उद्या (दि.०९) सकाळी ७ ते १० पिंपरी चिंचवड शहर दौऱ्यावर येत आहेत. नवी सांगवी येथील स्वर्गीय निळू फुले नाट्यगृहात समारोप सभा होणार आहे. आता चिंचवडचे जागा आणि पिंपरी विधानसभेच्या



उमेदवारीबाबत अजितदादा तिथे काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चिंचवडच्या जागेसाठी तीव्र असंतोष उफाळून आला आहे. मयूर कलाटे, प्रशांत शितोळे, मोरेश्वर भोंडवे, विनोद नढे या माजी नगरसवेकांनी आठवड्यापूर्वी एक पत्रकार परिषद घेऊन चिंचवडच्या जागेची मागणी केली. आम्ही भाजपचा प्रचार करणार नाही अन्यथा वेळप्रसंगी तुतारी हातात घेऊ असा इशाराही दिला होता. महायुतीच्या जागावाटप नियमानुसार ही जागा भाजपकडे आहे. मतदारसंघाच भाजपपेक्षा राष्ट्रवादीची ताकद अधिक असल्याचा माजी नगरसेवकांचा दावा आहे. त्यासाठीच ही जागा सोडावी अन्यथा सरळ शरद पवार यांच्या पक्षाची तुतारी हातात घेण्याचा इशारा त्यांनी दिला. प्रत्यक्षात सर्वांनी मिळून शरद पवार यांची भेट सुध्दा घेतल्याने हे प्रकरण आणखी तापले आहे.

भाजपच्या ताब्यातील ही जागा राष्ट्रवादीच्या इच्छुकांनी मागितल्याने भाजपचे आमदार उमा खापरे आणि अमित गोरखे यांनी पक्ष कार्यालयात बैठक घेऊन आम्ही राष्ट्रवादीचा प्रचार करणार नाही असे म्हणत त्यांनी सुध्दा पिंपरी राखीव या राष्ट्रवादीच्या जागेवर दावा केला. हा संघर्ष वाढत गेल्याने महायुतीच्या चिंचवड, पिंपरी आणि भोसरी अशा तीनही जागांना धोका संभवतो. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अजित पवार यांनी सोमवारी सायंकाळी सर्व नगरसेवकांना बारामतीत बोलावले होते. तिथेही सर्वांनी ती भूमिका कायम ठेवल्याने हवा गरम आहे. चिंचवडची जागा घेण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दादांनी कार्यकर्त्यांना दिले आहे.

प्रत्यक्षात वास्तव काय आहे हे पाहण्यासाठी त्यांनी आता दौऱ्याचे निमित्त केले असून त्यात ते चाचपणी करणार आहेत. सकाळी ७ ते १० असा हा धावता दौरा आहे. बोपखेल ते खडकी पूल, सांगवी ते बोपोडी पूल आणि पिंपरी गाव ते पिंपळे सौदागर पूल अशा नवीन प्रकल्पांचे उद्घाटन ते करणार आहेत. तसेच त्यानंतर सांगवी येथील निळू फुले नाट्यगृहात जाहीर सभा देखील होणार आहे.

---

# पंतप्रधान मोदींचे व्यवसायाभिमुख शिक्षणाचे स्वप्न साकार करू

## सर्व घटकातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी आमची : शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

विकसित भारतासाठी देशातील तळागाळातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत व्यवसायाभिमुख शिक्षण पोहचविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट आहे. त्यांचे हे स्वप्न साकार करण्यासाठी बार्टीसारख्या संस्थेच्या माध्यमातून सर्व घटकातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याची जबाबदारी आमची आहे व ती आपण निश्चितच पार पाडू, असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), मोरया सामाजिक प्रतिष्ठान, लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप पॅरामेडीकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने बजाज फिन्सर्वच्या सहकार्याने मोफत पॅरामेडिकल प्रशिक्षण, पॅरामेडिकल करिअर



2.0 आणि पॅरामेडिकल क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षण युवा पिढीसाठी 'आत्मनिर्भरतेचे एक नवीन पाऊल' या विषयावर आधारित कौशल्य विकास व पॅरामेडिकल प्रशिक्षण शैक्षणिक सत्राचा उद्घाटन समारंभ (दि.7 ऑक्टोबर) पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह या ठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी बोलताना जगताप म्हणाले की, बार्टी संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी वेगवेगळ्या कोर्सेसच्या माध्यमातून ५० ते ६० हजार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देतात. त्यांच्या माध्यमातून आमच्याही विद्यार्थ्यांना कला, कौशल्य, प्रशिक्षणाचा फायदा व्हावा, हा आमचा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. पुढील काळात आपल्या कॉलेजमधील ४० जागांची असलेली बॅच लवकरच सर्वांच्या साक्षीने चारशेची करू. केंद्र आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून आपल्याला तळागाळातील प्रत्येक घटकांपर्यंत विकास पोहचवायचा आहे.

# 'प्रधानमंत्री आवास' लाभार्थींना प्रशासनाचे 'दसरा गिफ्ट'

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश : पिंपरी, आकुर्डीतील लाभार्थींना सदनिकांचे होणार वाटप

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी पिंपरी व आकुर्डी येथे सदनिका निर्माण केल्या आहेत. या प्रकल्पातील लाभार्थींचा यावर्षीचा दसरा गोड होणार आहे. महापालिका प्रशासनाने सदर प्रकल्पाचा चावी वाटप कार्यक्रम लवकरच होणार आहे.

महानगरपालिका प्रशासनाने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून आकुर्डी येथे ५६८ सदनिकांच्या सहा इमारती बांधल्या आहेत. तसेच, पिंपरी येथे ३७० सदनिकांसाठी दोन इमारती बांधल्या आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार आणि लाभार्थींचा स्वहिस्सा आहे. सदर प्रकल्पांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला आहे. लाभार्थीही निश्चित झाले आहेत.



गेल्या दोन महिन्यांपासून लाभार्थी गृहकर्जाचे हप्ते भरीत आहेत. मात्र, प्रशासनाकडून सदनिकाधारकांना ताबा मिळाला नव्हता. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका आयुक्त व प्रशासन यांच्यासोबत बैठक घेतली होती. त्यावेळी 'लवकरच कार्यवाही करु', असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. त्यानुसार हा प्रश्न आता मार्गी लागला असून, आठवडाभरात चावी वाटप होणार आहे.


पिंपरी आणि आकुर्डी प्रधानमंत्री आवास योजना आरक्षण 'बेघरांसाठी घर' असे होते. मात्र, सदर प्रकल्पाची व्यापक जनहिताच्या दृष्टीने आरक्षणाचा उद्देश 'आर्थिक दुर्बलांसाठी घर' असा करण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. प्रकल्प उभारणी करुन लाभार्थींसाठी सोडत प्रक्रिया करण्यात आली. लाभार्थी निश्चित करुन आता सदनिकांचे वाटप होत आहे.

# पुण्यात 'आरटीई'अंतर्गत अवघे 13,667 प्रवेश

## यंदा 970 शाळांमध्ये आरटीईच्या 17,588 जागा उपलब्ध : त्यासाठी 48,155 अर्ज

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत पुणे जिल्ह्यात दरवर्षी आरटीईचे सर्वाधिक प्रवेश होतात. यंदा 970 शाळांमध्ये आरटीईच्या १७,५८८ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४८,१५५ अर्ज आले. त्यामुळे पहिली यादी आणि तीन प्रतीक्षा यादी मिळून पुणे जिल्ह्यात तब्बल १३,६६७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. परंतु आणखी एक विशेष फेरी राबविण्याची मागणी पालक संघटनांनी केली आहे.




### शिक्षण विभाग अधिकारी करत होते त्रुटी काढून आर्थिक तडजोड

» आम आदमी पक्षाच्या पालक युनियनचे समन्वयक मुकुंद कीर्दत म्हणाले, "न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. धक्कादायक बाब म्हणजे, पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील अधिकारी आणि कर्मचारी त्रुटी काढून आर्थिक तडजोड करत होते. त्यामुळे पालक हतबल होते. एकीकडे शाळा प्रशासन तुच्छतेची वागणूक देत होती, तर दुसरीकडे कागदपत्रे मिळविण्यासाठी तसेच लॉटरीमध्ये नाव येण्यासाठी पडताळणी समितीतील शिक्षण अधिकारी आर्थिक लूट करत होते. तक्रार निवारण केंद्र केवळ कागदावर होते. आरटीई प्रवेशापासून हजारो वंचित विद्यार्थ्यांसाठी आणखी एक फेरी घ्यावी अशी मागणी केली होती. परंतु ती पूर्ण झाली नाही. पुढील वर्षी जानेवारी महिन्यापासून प्रवेश प्रक्रिया सुरू करावी अशी विनंती आहे."

'आरटीई'अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत यंदा राज्यात ७८ हजार ३९८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रवेशासाठी यंदा प्राथमिक शिक्षण संचालनालयाद्वारे एक नियमित फेरी आणि तीन फेऱ्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आल्या. तरीदेखील २६,८४० जागा रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुण्यामध्ये पहिल्या यादीत १६,३३७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यापैकी १०,४०५ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. पहिल्या प्रतीक्षा यादीत ४,६७२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यापैकी २,२९१ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. दुसऱ्या प्रतीक्षा यादीत १,६०४ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यापैकी ७१४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. तिसऱ्या प्रतीक्षा यादीत ५८४ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यापैकी २५७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले.

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया दरवर्षी राबवण्यात येते. यामध्ये आर्थिक वंचित आणि आरक्षित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळांमध्ये उपलब्ध जागांच्या २५ टक्के जागांवर मोफत प्रवेशाची संधी देण्यात येते. संबंधित इंग्रजी शाळांचे शुल्क शासनाद्वारे आरटीई शुल्कप्रतीपूर्तीच्या माध्यमातून संबंधित शाळांना देण्यात येत असते.

"आरटीई प्रवेश मुळात तीन महिने उशिरा सुरू झाली होती. तसेच न्यायालयातील अनेक याचिका, खासगी शाळांचा नकार आणि कागदपत्रांसाठी पालकांची धावपळ अशी भीषण अवस्था होती. त्यामुळे आरटीई अंतर्गत प्रवेशापासून हजारो मुले-मुली वंचित आहेत. त्यांच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राहिला नाही. विशेष फेरी घ्यायला पाहिजे होती. परंतु किमान पुढील वर्षी जानेवारीपासून प्रवेश प्रक्रिया सुरू व्हावी, अशी अपेक्षा सम्यक फाऊंडेशन महाराष्ट्रचे संस्थापक आनंद रणधीर यांनी व्यक्त केली.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक शरद गोसावी म्हणाले, "यंदा राज्यातील ९,२१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २३८ जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या होत्या. त्यासाठी २ लाख ४२ हजार ५१६ पालकांनी आपल्या मुलांचे अर्ज भरले होते. या अर्जांतून पहिल्या नियमित यादीमध्ये ९३,००९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यातील ६०,९८९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. त्यासाठी सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेशासाठी संधी दिल्यानंतर आणखी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी तीन वेळा फेरी राबविण्यात आली. या फेऱ्यांमध्येदेखील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. या वर्षीची आरटीई प्रवेश प्रक्रिया अखेर संपली असल्याचे जाहीर केले आहे."

# 'डिक्की'ने दलित, आदिवासींना उद्योजक बनवावे

## किरेन रिजिजू यांचे आवाहन : पुण्यात दलित उद्योजकांसोबत साधला मुक्तसंवाद

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या वीस वर्षात दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने (डिक्की) उद्योग विश्वात अतिशय मोलाचे कार्य केले आहे. आता देशातील गावोगावी आणि पूर्व भागातील आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांना उद्योजक बनवण्यासाठी दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने (डिक्की) पुढाकार घेतला पाहिजे. त्यासाठी भारत सरकार आणि आम्ही पूर्णपणे प्रोत्साहन देऊन ,सहकार्य करू असे आश्वासन केंद्रीय अल्पसंख्याक व संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी दिले. पुण्यात आज दलित उद्योजकांची परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.



### 'बार्टी'ला भेट

» रिजिजू यांनी पुणे दौऱ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था (बार्टी) ला भेट दिली. तसेच, तेथील उपक्रम आणि योजनांची अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यासोबतच, क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या समाधी स्मारकाला भेट देत अभिवादनही केले.

रिजिजू म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते अर्थशास्त्राचे अभ्यासक आणि अर्थतज्ज्ञ होते. त्यामुळे त्यांच्या इतर कार्याबरोबरच अर्थशास्त्राचे विचार आणि धोरण सर्वांनी आत्मसात करणे गरजेचे आहे .'डिक्की' च्या कार्याचे त्यांनी कौतुक करून त्यांच्या देशभरातील कार्यासाठी आपण सर्व प्रकारचे सहकार्य करू असे आश्वासन दिले. यावेळी दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या (डिक्की) वतीने रिजिजू यांचे स्वागत संस्थापक पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी केले. पुणे विभागाच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

पद्मश्री मिलिंद कांबळे यांनी आपल्या मनोगतात दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिक्की) चा प्रवास आणि आजपर्यंत केलेल्या विविध कार्याचे स्वरूप यावेळी सांगितले. या कार्यक्रमास पद्मश्री कांबळे, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, डिक्कीचे सल्लागार सचिन वाणी, पश्चिम भारताचे अध्यक्ष अविनाश जगताप, महिला समन्वयक सीमा कांबळे, पुणे अध्यक्ष ललित बन्सोड, तसेच पुणे विभागातील प्रमुख दलित उद्योजक उपस्थित होते. सूत्रसंचालन मैत्रेयी कांबळे तर आभार ललित बन्सोड यांनी मानले.

# उद्योगनगरीतील बहुतांश व्यवसाय अनधिकृत

## केवळ सहा हजार व्यावसायिकांकडे पालिकेची परवानगी : शहरात सुमारे 20 हजार लहान-मोठे उद्योग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजकांनी कंपन्या, विविध व्यवसाय आणि त्या व्यवसायाचे नामफलक लावण्यासाठी महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. असे असताना कंपनी किंवा दुकानांवरील नामफलक लावताना पालिकेची कोणतीही परवानगी न घेता व्यवसाय सुरू असल्याचे समोर आले आहे. यामुळे महापालिकेचे आत्तापर्यंत लाखो रुपयांचे नुकसान झाल्यानंतर आता खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने व्यावसायिकांना नोटिसा देण्यास सुरुवात केली आहे. शहरात सुमारे २० हजार लहान-मोठे उद्योग असून यापैकी केवळ सहा हजार १५० व्यावसायिकांनी पालिकेची परवानगी घेतली आहे.



शहराचा दिवसेंदिवस विस्तार होत असून ३० लाखांच्या घरात लोकसंख्या गेली आहे. लोकसंख्या वाढत असताना चिंचवड, भोसरी एमआयडीसी, तळवडे आयटी पार्क परिसरात नामांकित कंपन्यांसह शहराच्या विविध भागात किराणा, कापड, हॉटेल, स्टेशनरी, बेकरी, स्वीट मार्ट यासारखे अनेक लहान-मोठे व्यवसाय सुरू आहेत. हे व्यवसाय सुरू करताना महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे रितसर शुल्क भरून परवानगी घेणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम ३१३ व ३७६ नुसार बंधनकारक आहे. परंतु, व्यावसायिक महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता व्यवसाय करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. शहरात विविध नामांकित कंपन्या असून सुमारे चार हजार लघुउद्योग आहेत. त्याचबरोबर पिंपरी कॅम्पात मोठी बाजारपेठ असून यासह निगडी, भोसरी, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, मोशी, दापोडी आदी भागात सुमारे २० हजार लहान-मोठे व्यवसाय सुरू आहेत. परंतु, महापालिकेची सहा हजार कंपन्या, व्यावसायिकांनी परवानगी घेतली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून आकाशचिन्ह व परवाना विभागाने उद्योगधंद्या, नामफलकासह व्यवसायाची परवानगी न घेणाऱ्या ५९९ व्यावसायिकांना नोटिसा देण्यास सुरुवात केली आहे. नोटिसा दिल्यानंतर आत्तापर्यंत १५० व्यावसायिकांनी परवाना शुल्क भरून महापालिकेची रितसर परवानगी घेतली आहे.

### 30 जूनपर्यंत नूतनीकरण बंधनकारक

» उद्योगधंदा परवाना फी ४५० पासून २५ हजारांपर्यंत महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने उद्योगधंदा, व्यवसाय आणि नामफलकाची परवानगी दिली जाते. उद्योगधंदा परवानगी देताना कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार ४५० रुपये ते २५ हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जाते. तर नामफलकासाठी नाममात्र शुल्क आहे. तसेच या परवान्याचे दरवर्षी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला म्हणजे एप्रिल महिन्यात नूतनीकरण करणेही बंधनकारक आहे. सवलत म्हणून ३० जूनपर्यंत नूतनीकरण करण्यास मुदत आहे. त्यानंतर वार्षिक परवाना फीवर दरमहा १० ते १२० टक्के विलंब शुल्क आकारण्याची तरतूद आहे.

# चिखली घरकुलच्या प्रलंबित प्रश्नांना अखेर मिळाला न्याय!

## सीमाभिंत, ड्रेनेज, स्ट्रॉमवॉटर लाईनचे कामाचा 'श्रीगणेशा' : आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीमुळे समस्या निकालात

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली घरकूल येथील पायाभूत सोयी-सुविधा आणि समस्यांबाबत महानगरपालिका प्रशासन आता खडबडून जागे झाले आहे. घरकूलची सीमाभिंत, ड्रेनेज व स्ट्रॉमवॉटर लाईनचे काम सुरू झाले असून, लवकरच काम पूर्ण करण्यात येईल, असा दावा प्रशासनाने केले आहे.

चिखली घरकुलच्या समस्यांबाबत आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीमध्ये घरकुल प्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक घेतली होती. त्यावेळी नागरीकांच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी सूचना केली होती. अखेर प्रशासनाने काम सुरू केले आहे. त्यामुळे सर्वसामान्य घरकुलवासीयांना दिलासा मिळाला आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, राज्य शासन आणि केंद्र शासनाने आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना घर मिळावे. या उद्देशाने २००८ मध्ये 'जेएनएनयुआरएम' अंतर्गत चिखली से. १७/१९ नेवाळे वस्ती या ठिकाणी ६ हजार ७२० घरांची निर्मिती करण्याची योजना आणली आहे. २०१४ मध्ये या प्रकल्पातील लाभार्थींना घरांचे वाटप करण्यात आले. मात्र, प्रकल्पाच्या 'डिझाईन'प्रमाणे सोयी-सुविधा विकसित झालेल्या नाहीत. त्यामुळे घरकुलच्या रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.

दरम्यान, घरकुलमधील समस्यांबाबत अशोक मगर यांनी बुधवारी घरकुलच्या प्रवेशद्वारासमोर उपोषण सुरू केले होते. यानंतर आमदार महेश लांडगे यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली आणि या प्रश्नाबाबत तातडीने बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार आज आयुक्त कार्यालयात बैठक झाली होती.

महानगरपालिका प्रशासनाने ड्रेनेज लाईन नवीन टाकण्याचे काम सुरू केले आहे. सीमाभिंत बांधणी सुरू झाली आहे. तसेच, आता शेतकऱ्यांच्या माध्यमातून भाजी मंडई सुरू करण्यात येईल. सांस्कृतिक भवन निवडणूक कार्यालयाच्या ताब्यात आहे. निवडणुकीनंतर ते घरकुलवासीयांसाठी खुले करण्यात येईल. पुढच्या वर्षी घरकुलमध्ये पावळ्यात पाणी साचणार नाही. याप्रमाणे 'ॲक्शन प्लॅन' करण्यात येईल. तसेच, घरकुल वासीयांच्या १० वर्षांच्या टॅक्स माफीबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

### घरकुलच्या समस्येचे मूळ कारण काय?

» चिखली घरकुल प्रकल्पाची निर्मिती करताना तेथील भौगोलिक स्थिती आणि भविष्यात वाढणारी लोकसंख्या आणि परिसराचा विकास याचा विचार करुन प्रकल्प उभारला नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यापेक्षा सखल भागात प्रकल्प उभारला आहे. परिणामी, पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या, ड्रेनेज समस्या यासह पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यात अनेक अडचणी आहेत.

> चिखली घरकूल प्रकल्पाला तांत्रिक व भौगोलिक अडचणींमुळे काही समस्या वर्षानुवर्षे रखडलेल्या आहेत. घरकूल येथील शिष्टमंडळासोबत आयुक्त व प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली होती. त्यानुसार, प्रशासनाने कामाला सुरूवात केली. आगामी काळात घरकुलच्या समस्या कालबद्ध नियोजन करून मार्गी लावण्याबाबत पुढाकार घेणार आहे.
> 
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# कारागृह नव्हे पंचतारांकित हॉटेल!

## उपाहारगृहात मिळतात सर्व ऐषआरामाच्या दैनंदिन वस्तू : ड्रायफ्रूटपासून सौंदर्यप्रसाधनापर्यंत हव्या त्या वस्तू उपलब्ध

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील कारागृहात कैद्यांना सुधारणा व पुनर्वसनासाठी ठेवले जाते. कैद्यांमधील गुन्हेगारीवृत्ती कमी होऊन तो एक चांगला नागरिक घडावा असा यामागचा उद्देश असतो. मात्र, राज्यातील कारागृहात असणा-या कैद्यांना पंचतारांकित हॉटेलप्रमाणे सोई-सुविधा मिळत आहेत. त्यामुळे कैद्यांमधील गुन्हेगारी वृत्ती कशी कमी होणार, असा प्रश्न निर्माण होतो.




कारागृहातील सोयीसुविधांचे उदाहरण द्यायचे झाल्यास आंघोळीसाठी मोती साबण, फेस वॉश, शॉवर, जेल, फेअर अॅण्ड लव्हली, हेअर कलर, शेव्हिंग क्रीम आदी वस्तू कारागृहात उपलब्ध आहेत. न्याहरीसाठी विविध फळे, दूध, अंडी, बिस्किटांचे डझनभर प्रकार, खारी, टोस्ट आदी बेकरीतील खाद्यपदार्थांची तेथे रेलचेल आहे. तसेच हॉर्लिक्स, बोर्नव्हिटा, च्यवनप्राश, मिक्स फ्रुटजाम, ओट्स, बोकडाचे मटण, कोंबडीचे मटण, त्यासाठीचे सर्व प्रकारचे मसाले, बासमती तांदूळ, पापड, केशर आदी वस्तू मिळतात. याच्याबरोबरीने पुरणपोळी, ड्रायफ्रूट तर दिवाळीत करंजी, अनारसे, शंकरपाळी, रवा, मोतीचूर व बेसन लाडू ते नामांकित कंपनीचे टी शर्ट, पॅन्ट, शर्टपासून ते अंडरगार्मेंटचे हवे ते कपडे मिळतात. व्यसनासाठी तंबाखू आणि विविध कंपन्यांच्या सिगारेटही उपलब्ध आहेत. अशा वस्तूंची यादी पाहिली तर हे कारागृह आहे की पंचतारांकित हॉटेल असा प्रश्न पडल्यास नवल वाटायला नको. पैसेवाल्या कैद्यांना अशा वस्तू जर मिळत असतील तर जन्मठेपेची शिक्षा ते ऐष आरामात घालवतील यात शंकाच नाही.

राज्यात साठ कारागृहे आहेत. यापैकी नऊ मध्यवर्ती कारागृह आहेत. तेथे तब्बल तीस हजार कैदी कारागृहात शिक्षा भोगत आहेत. यातील तीस टक्के पक्के कैदी तर सत्तर टक्के कच्चे कैदी आहेत. या कैद्यांपैकी अनेक कैदी गुन्हेगारीतील सराईत आहेत, तर काही श्रीमंतही असतात. अशा कैद्यांना कारागृह हे शिक्षेचे ठिकाण न वाटता, एक पंचतारांकित हॉटेल वाटते. याचे कारण कारागृहातील उपाहारगृहात मिळणा-या शेकडो ऐष आरामांच्या वस्तूंमुळे त्यांचे जीवन सुखकर, आनंददायी झाले आहे.

कारागृहातील कैद्यांना सकाळी आंघोळीच्या साबणापासून ते रात्री झोपताना डासांपासून बचाव करण्यासाठी ओडोमासपर्यंतच्या वस्तू मिळतात. पैसेवाल्या कैद्यांना सकाळी न्याहरीसाठी गरमागरम दूध, अंडी, विविध हंगामात मिळणारी विविध फळे हवी तेवढी उपलब्ध असतात. दुपारी व संध्याकाळी जेवणात चिकन, मटण, बासमती तांदळाची बिर्याणी असते. विविध कंपन्यांची बिस्किटे, बेकरी उत्पादने मिळतात. याशिवाय शेंगदाणा लाडू, बाकरवडी, फरसाणही मिळते.

### ड्रायफ्रूट, फळे व इतर खाद्यपदार्थ

**» कारागृहातील उपाहारगृहात खजूर, खारीक, मनुके, काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड आदी ड्रायफ्रूट तर मोसंबी, संत्रे, द्राक्षे, सफरचंद, आंबे, कलिंगड, अननस, चिकू, स्ट्रॉबेरी, डाळिंब, अंजीर, केळी, खरबूज, पेरू आदी हंगामी फळे उपलब्ध असतात. त्यामुळे कैदी कारागृहात आजारी पडण्याची शक्यता नसते. दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये गाई, म्हशीचे दूध, ताक, दही, पनीर, लस्सी, श्रीखंड, चीज, दूध पावडर, आईस्क्रीम, ज्यूसही उपलब्ध असते.**

### स्टेशनरी, होजिअरी साहित्य

**» कारागृहाच्या उपाहारगृहात लेखन साहित्य, स्केचपेन, वॉटरकलर, नोटबुक, आखीव कागद, फोन डायरी, आर्चबुक, प्लास्टिक फोल्डर, कागदी पाकिटांपासून ते पाटी-पेन्सिलपर्यंतच्या वस्तू उपलब्ध आहेत. उलन कानटोपी, स्वेटर, अंडरवेअर, बनियन, बर्मुडा, नामांकित कंपनीचे टी शर्ट, शर्ट, पॅन्ट उपलब्ध आहेत. चप्पल, सॅन्डल, रेनकोट, छत्री, टिफिन, मच्छर अगरबत्ती, अगरबत्ती, पेपर नॅपकिन पर्यंतच्या वस्तूही उपाहारगृहात मिळतात.**

# सहकारी संस्था निवडणुका विधानसभेमुळे पुन्हा स्थगित

## 31 डिसेंबर 2024 पर्यंत पुढे ढकलल्या : कोर्ट आदेश असलेल्या संस्थांच्या मात्र निवडणुका घेता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुढील महिन्यात होऊ घातलेली विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक लक्षात घेऊन राज्य सरकारने सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका स्थगित केल्या आहेत. या निवडणुका ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या असून सहकार विभागाने सोमवारी यासंदर्भातील आदेश जारी केला. मात्र, या निर्णयातून २५० पेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था, न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिलेल्या संस्था व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ज्या संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड बाकी आहे, अशा संस्थांना वगळण्यात आले आहे.



सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर स्थगित करून ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्याचे सहकार विभागाने म्हटले आहे. याआधी जून २०२४ मध्ये पावसामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली हाती.

**विधानसभेमुळेच दिली स्थगिती :** विधानसभा निवडणूक प्रक्रियेच्या कामकाजासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी सहकार विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची सेवा अधिग्रहित केल्यास सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्यात अडचणी येऊ शकतात. हे लक्षात घेऊन राज्य सरकारने सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

### याआधी पावसामुळे पुढे ढकलल्या निवडणुका

राज्यातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन राज्य सरकारने २० जून रोजी सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, ही मुदत संपल्यानंतर प्राधिकरणाच्या आयुक्तांनी या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या आदेशाने ज्या संस्थेच्या निवडणुकीला स्थगिती दिलेली आहे, अशा संस्था वगळून राज्य सरकारच्या आदेशानुसार ज्या संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर पुढे ढकलल्या आहेत, त्या टप्प्यानुसार १ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले होते.

### 29,443 संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया होती सुरू

**» राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या अहवालानुसार २९,४४३ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया १ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आली होती. यात 'अ' वर्गातील ४२, 'ब' वर्गातील १७१६, 'क' वर्गातील १२ हजार २५० आणि 'ड' वर्गातील १५ हजार ४३५ संस्थांचा समावेश आहे. त्यापैकी ७,१०९ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू होती.**